**ठळक बातम्या**

- भारतानं आपली अर्थव्यवस्था गेल्या दहा वर्षात दुपटीनं वाढवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- रामनवमीनिमित्त देशभरात ठिकठिकाणी शोभायात्रा आणि विविध कार्यक्रमांचं आयोजन, अयोध्येतल्या राम मंदिरात विशेष किरणोत्सव

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा गुजरात टायटन्सचा निर्णय

**आणि**

- येत्या ३-४ दिवसात महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस वाढ होण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज तमीळनाडूत रामेश्वरम इथं समुद्रावरच्या उभ्या उघडता येणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनासह विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. त्यानंतर आयोजित सभेला त्यांनी संबोधित केलं. गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवली आहे, आणि देशाची चारही टोकं जोडण्याच्या उद्देशानं पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी समर्पित प्रयत्न केले आहेत असं ते म्हणाले. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असल्याचं ते म्हणाले, यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर मुंबईतील अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांची उदाहरणं मांडली.

पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी या पुलाखालून जाणाऱ्या पहिल्या जहाजाला, तसंच या पुलावरून जाणाऱ्या रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवला. यानंतर प्रधानमंत्री रामेश्वरममधे एका रोड शोमध्ये सहभागी झाले. त्यांनी रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतलं. रामेश्वरम इथं आयोजित सभेत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते तमीळनाडूतल्या ८ हजार ३०० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण देखील झालं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दौऱ्याच्या आज अखेरच्या दिवशी, प्रधानमंत्री आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या हस्ते माहो ओमंथाई रेल्वे प्रकल्पाचं उद्घाटन झालं. यावेळी दोन्ही नेत्यांनी माहो अनुराधापुरा मार्गावर सिग्नल यंत्रणेच्या फलकाचंही अनावरण केलं. हे दोन्ही प्रकल्प भारताच्या पाठबळानं साकारलेले प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमुळे श्रीलंकेचा उत्तरेकडचा भाग आणि कोलंबो दरम्यान सुरळीत, सुरक्षित आणि विश्वासार्ह रेल्वे सेवेची सुनिश्चिती होणार आहे.  त्याआधी दोन्ही नेत्यांनी जय श्रीमहाबोधी मंदिरात जाऊन प्रार्थना केली. प्रधानमंत्र्यांच्या श्रीलंका भेटीदरम्यान सद्भावनेचं प्रतीक म्हणून श्रीलंकेनं १४ भारतीय मच्छीमारांची सुटका केली आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यासाठी रवाना झाल्या. आपल्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्या आज रात्री उशिरा पोर्तुगालला पोहोचतील. आपल्या पोर्तुगाल दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू पोर्तुगालच्या राष्ट्रपती मार्सेलो रेबेलो डी सौसा यांची भेट घेऊन शिष्टमंडळ स्तरीय चर्चा करतील. त्या पोर्तुगालचे

प्रधानमंत्री लुईस मॉन्टेनेग्रो आणि त्यांच्या राष्ट्रीय संसदेचे अध्यक्ष जोस पेड्रो अगुइर-ब्रँको यांचीही भेट घेणार आहेत. गेल्या २७ वर्षांमधली भारताच्या राष्ट्रपतींची पहिली पोर्तुगाल भेट असणार आहे. या भेटीमुळे भारताच्या पोर्तुगालसोबतच्या संबंधांना नवी चालना मिळणार आहे. पोर्तुगालचा दौरा आटोपून स्लोव्हाकियाला पोहोचल्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्लोव्हाकीयाचे राष्ट्रपती पीटर पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतील. गेल्या २९ वर्षांमधील भारताच्या राष्ट्रपतींची पहिली पोर्तुगाल भेट असणार आहे. या भेटीमुळे भारताला स्लोव्हाकियासोबतचे संबंध दृढ करण्यासोबत, त्याचा विस्तार करण्याची संधी मिळणार आहे.

**<><><><><>**

आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतल्या राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या राममंदिरांमध्ये दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा साजरा झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत भाविक येत आहेत. देशभरात ठिकठिकाणी भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रा देखील काढण्यात आल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमी आपल्याला धर्म, न्याय आणि कर्तव्य भावनेची जाणीव करून देते असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर भगवान श्रीरामांचे आशीर्वाद आपल्या सर्वांवर राहावेत आणि आपल्याला मार्गदर्शन करत राहोत, अशी इच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

रामनवमीनिमित्त आज अयोध्येतल्या राम मंदिरात दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. रामलल्लाच्या कपाळावर सूर्याच्या किरणांनी तिलक लावल्यानंतर श्रीरामांना छपन्न भोग अर्थात नैवेद्य दाखवण्यात आला. रामजन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत आज पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारताच्या हितेश गुलिया यानं सुवर्णपदक पटकावलं. हितेशनं अंतिम सामन्यात इंग्लंडच्या ओडेल कामारा याचा पराभव केला. भारताच्याच अभिनाश जामवालया यानं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. अंतिम फेरीत अभिनाशला ब्राझीलच्या युरी रीसकडून ० - ५ असा पराभव पत्करावा लागला. याआधी काल पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या मनीष राठोड यानं कांस्य पदकाची कमाई केली.

**<><><><><>**

सर्व नागरिकांना समान संधी देणं, त्यांना समान वागणूक देणं आणि समाजातल्या मागासलेल्या तसंच वंचित घटकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणं हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे असं प्रतिपादन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केलं आहे. ते आज उझबेकिस्तानमधील ताश्कंद शहरात पार आयोजित

आंतर-संसदीय संघाच्या म्हणजेच IPU च्या १५० व्या महासभेत बोलत होते. ही महासभा **सामाजिक विकास आणि न्यायासाठी संसदीय कृती** या संकल्पनेवर आधारलेली आहे.

**<><><><><>**

इफ्कोच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे नॅनो युरीया आणि नॅनो डीएपीनं जगभरात भारताची प्रतिमा उजळली असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज गांधीनगरमधे कलोल इथं इफ्कोच्या सुवर्ण जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. इफ्कोच्या आधुनिक प्रयोगशाळांतल्या संशोधनाचा फायदा शेतांपर्यंत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. इफ्कोच्या बियाणे संशोधन विभागाचं त्यांनी यावेळी उद्घाटन केलं.

**<><><><><>**

येत्या ३-४ दिवसात महाराष्ट्र, वायव्य भारत, मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पात कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. गुजरात, राजस्थान, हरियाणा चंदीगढ, दिल्ली आणि पंजाबमधे पुढचे चार-पाच दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. पूर्व भारतात येत्या १० तारखेपर्यंत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. पूर्व आणि ईशान्य भारत तसंच कर्नाटक आणि आंध्रप्रदेश किनारपट्टीवर पुढचे पाच दिवस सोसाट्याचा वारा विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. अंदमान निकोबारमधे पुढचे सहा ते सात दिवस अशीच स्थिती राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**